शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२...

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.१०१७०/२०२३ मधील दिलेल्या निदेशानुसार श्री.विराज परदेशी यांच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याच्या अर्जावर सुनावणी घेवून निर्णय घेण्याबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन आदेश क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २६ ऑगस्ट, २०२३

वाचा-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.१४ डिसेंबर, २०२२

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.३१ जानेवारी, २०२३

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.१०१७०/२०२३ मधील दि.२३/८/२०२३चे आदेश

४. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या दिनांक २५/८/२०२३ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना -

श्री.विराज परदेशी यांनी मॉडर्न पेन्टॅथलॉन या क्रीडा प्रकाराकरीता सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षातील पुरस्काराकरिता अर्ज सादर केला होता. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीने श्री.परदेशी यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्ताऐवजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित करून देण्यात आलेल्या अटीची पुर्तता होत नसल्याने त्यांना पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते. शासनाच्या या निर्णयाविरोधात श्री.परदेशी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१०१७०/२०२३ दाखल केली होती. सदर याचिकेबाबत दिनांक २३/०८/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने श्री.परदेशी यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबत विहीत शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून पुनर्विचार करावा असे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने श्री.विराज परदेशी यांच्या प्रकरणी निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश -

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ-३" मधील नियम क्र.६ मधील क्र.६.१ नुसार खेळाडूस पुरस्कार वर्षापासून लगतपूर्व ५ वर्षामध्ये कोणत्याही तीन वर्षात संबंधित खेळाडूने अधिकृत संघातर्फे संबंधित खेळाच्या अधिकृत राष्ट्रीय फेडरेशन मार्फत आयोजित वरिष्ठ गटाच्या (सिनीअर) राष्ट्रीय स्पर्धेमध्ये/राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) मध्ये महाराष्ट्राच्या प्रातिनिधीक संघाकडून सहभागी होवून किमान एक पदक (प्राविण्य) संपादन केले आहे, अशा खेळाडूंचा गुणांकना करीता विचार करण्यात येईल. श्री.परदेशी यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्ताऐवजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित करून देण्यात आलेल्या अटीची पुर्तता होत नसल्याने त्यांना पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०८/२०२३ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) आयोजित केलेल्या बैठकीमध्ये श्री.परदेशी यांनी निदर्शनास आणले की, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराचे नियमावलीमधील नियम क्र.२२ अनुसार अर्जदार सन २०१९-२० आणि २०२०-२१ च्या पुरस्काराकरीता पात्र ठरत आहे. तर राज्यस्तरीय पुरस्कार निवड समिती सदस्य श्री.नामदेव शिरगावकर, महासचिव, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन (मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिकेतील प्रतिवादी क्र.६) यांनी कोणत्या क्रीडा प्रकारात कोणत्या उपप्रकारांचे आयोजन करण्यात यावे, याचा अधिकार संबंधित राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेचा असल्याने पुरस्काराकरीता विचार करताना फक्त क्रीडा प्रकाराच्या नावाचा विचार करण्यात यावा, उपप्रकारांचा विचार करण्यात येऊ नये असे प्रतिपादित केले. तसेच, कोणत्याही खेळाडूचे नुकसान होऊ नये व खेळाडूंच्या हिताचा निर्णय घेण्यात यावा, असे त्यांनी समितीसमोर नमूद केले.

३. श्री.शिरगावकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, ऑलिंपिक, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्ससारख्या महत्वपूर्ण आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मॉडर्न पेन्टॅथलॉन या क्रीडा प्रकाराच्या स्पर्धांचे आयोजन करत असतांना संपूर्ण पाच उपप्रकारांचे आयोजन केले जाते. तथापि अन्य आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये मात्र तसे होत नाही. श्री.विराज परदेशी यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे क्रीडा प्रमाणपत्र जोडलेले आहेत. सदर आंतरराष्ट्रीय स्पर्धांपैकी सन २०१६-१७ या वर्षातील एशियन ओपन मॉडर्न पेन्टॅथलॉन स्पर्धेत सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे सन २०१९-२० या वर्षातील बेलारूस ओपन ऑलिंपिक रँकींग स्पर्धेत सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. उपरोक्त दोन्ही स्पर्धा या ओपन स्पर्धा असल्याने शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे गुणांकनास पात्र नाहीत. श्री.विराज परदेशी यांनी मॉडर्न पेन्टॅथलॉन वर्ल्ड कप, इजिप्त या स्पर्धेत सहभागी झाल्याबाबत कागदपत्रे सादर केलेली आहेत. तथापि, सदर स्पर्धेत पाच उपप्रकारांपैकी चार उपप्रकार आयोजित केलेले आहेत. मॉडर्न पेन्टॅथलॉन या क्रीडा प्रकारात एकूण पाच उपप्रकाराच्या स्पर्धांचा समावेश असल्याने या स्पर्धेतील कामगिरीचे गुणांकन करण्यात आलेले नाही.

४. श्री.परदेशी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार नियमावलीतील नियम क्र.२२ मध्ये राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीचा अधिकार नमूद केलेला आहे. सदर नियमातील तरतुदीनुसार उप प्रकारातील खेळाडूस पुरस्काराचा हक्क/अधिकार असल्याचे दिसून येत नाही. तसेच, श्री.परदेशी यांचेकडे पुरस्काराकरीता निश्चित केलेल्या क्रीडा प्रकारातील आवश्यक अर्हता नसल्याने त्यांचे प्रकरणी नियम क्र.२२ मधील तरतूदीचा अवलंब करता येणार नाही.

५. श्री. विराज परदेशी यांनी राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्याची/सहभागाची प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर केलेली आहेत. तथापि, सदर प्रमाणपत्रे ही बायथले/ट्रायथले या उपप्रकारांची आहेत. या दोन्ही उपप्रकारांचा समावेश ऑलिंपिक/कॉमनवेल्थ/आशियाई क्रीडा स्पर्धेत नाही. त्यामुळे या स्पर्धा शासन निर्णयातील तरतूदीनुसार अधिकृत राष्ट्रीय स्पर्धा ठरत नसल्याने गुणांकनाकरीता किंवा पात्रतेकरीता नियम क्र. ४ आणि नियम क्र.६.१ अन्वये पात्र ठरत नाहीत.

६. श्री.परदेशी यांच्या अर्जाच्या छाननीकरिता मॉडर्न पेन्टॅथलॉन या क्रीडा प्रकाराच्या राज्य संघटनेच्या (प्रतिवादी क्र.५) प्रतिनिधीस गुणांकन तपासण्याकरीता आमंत्रित करण्यात आले होते. राज्य संघटनेमार्फत श्री.खासनीस हे मुख्य क्रीडा मार्गदर्शक प्रमाणपत्रे व गुणांकन तपासण्यासाठी शिवछत्रपती क्रीडा संकुल, पुणे येथे प्रत्यक्ष उपस्थित झाले होते. श्री.खासनीस यांनी श्री.परदेशी यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करून श्री.परदेशी हे शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरिता अपात्र असल्याचे नमूद केले आहे.

७. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिकेत नमूद प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी सदर विषयी शासनास दिलेल्या पत्रात उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा प्रचलित शासन नियमावलीच्या कसोटीवर विचार करण्यात आलेला आहे.

८. त्यामुळे श्री.विराज परदेशी हे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ-३" मधील नियम क्र.६ मधील क्र.६.१ नुसार नियमाची पूर्तता करीत नसल्याने ते मॉडर्न पेन्टॅथलॉन या क्रीडा प्रकाराकरिता सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षांच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराकरिता पात्र ठरत नाहीत. यामुळे त्यांची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज्ञानेश्वर आव्हाड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे खाजगी सचिव

२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,

३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,

४) श्री.विराज परदेशी (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत),

५) सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ.,

६) निवडनस्ती क्रीयुसे-२